# 'संस्कृती'

जगातील कानाकोपऱ्यात वसत असलेल्या असंख्य संस्कृतींमध्ये सर्वात प्राचीन व परमश्रेष्ठ संस्कृती म्हणून भारतीय संस्कृतीचा उल्लेख अभिमानाने करता येईल।

संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीस प्राप्त होत असते. संस्कृती ही व्यक्तीच्या आयुष्याची दिशा निश्चित करते. मानवाचे जीवन अंतर्बाह्य व्यापून टाकते.

वेगवेगळ्या विचारवंतांनी 'संस्कृती' या शब्दाचे विविध अर्थ, अनेक व्याख्या केल्या आहेत. 'सं' म्हणजे चांगले व 'कृती' म्हणजे कार्य, भावना व क्रिया चांगल्या असल्याने वर्तन चांगले होते. अशा व्यक्ती इतरांचे भले करतात. ही व्यक्ती सुसंस्कृत होय आणि अशा चांगल्या आचारविचारांची विशिष्ट संहिता म्हणजे त्या देशाची संस्कृती होय.

भारतीय तत्त्वज्ञान चार वेद, गीता, उपनिषदे, विविध दर्शने, योग, जातक कथा, रामायणादी ग्रंथ इ. सुस्पष्टतेने सांगितले आहे.

औदार्य - सहिष्णुता - संग्राहकता या त्रिस्तंभावर भारतीय संस्कृतीची भव्य इमारत खंबीरपणे उभी आहे.

भारतीय संस्कृतीत चारित्र्याला विशेष महत्त्व दिले गेले आहे. विविध प्रदेशांच्या विविध चालीरीती असूनही या विविधतेच्या अंतरंगात एकत्वाची अनुभूती सदैव जागृत राहिली आहे. "एकं सद् विप्राः बहुधा वदन्ति" हा विचार दृढ आहे. ज्ञानात एकतेचे दर्शन घेणे हा भारतीय संस्कृतीचा विशेष म्हणावा. 'न त्वं शोचितुमर्हसि' म्हणजे 'मृत्यूचे भय न करता तू सत्कार्य करत रहा' असा संदेश देणाऱ्या भारतीय संस्कृतीवर हिंदू धर्माचा विशेष पगडा आहे.

भारतीय संस्कृतीही विश्वातील सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते कारण निसर्ग, मानव, प्राणी, मानवी मन आरोग्य, बुद्धि आणि इतिहास यातील उपयुक्त गोष्टी लक्षात घेवुन केलेला उत्कट समन्वय म्हणजे भारतीय संस्कृती. धर्माच्या भरभक्कम चौकटीत विविध सण, आचार, व्रते, उत्सव, परंपरा चालीरीती अतिशय चपखल पणे बसवुन दिल्या आहेत.

कालानुरूप या रितीरिवाज बदल होत गेले तरी आपल्या संस्कृतीला तिळमात्रही धक्का पोहोचू शकला नाही.

भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे. त्रेता, द्वापर व कली ही युगे इतिहास जमा झालीत. २१ व्या शतकाकडे वाटचाल करतांना येणाऱ्या समस्यांवर रामबाण उपाय म्हणुन सर्व जगास भारतीय संस्कृतीच आठवावी हे आपले परमभाग्य!

सौ प्रज्ञा राजेंदरकर
नागपूर
९६६५०९३८९०

